भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/११/२०१६

१) बिना परवाना रेतीची चोरी. :–

दिनांक १९/११/२०१६ रोजी ०१.४० वा ते ०३.४० वा. दर. यातील ६ ही आरोपीतांनी संगमत करून लिलाव न झालेल्या नदीच्या घाटातील पाण्यातुन बिना परवाना जेसीबी च्या सहायाने रेतीचा उपसा करून नदिचे काठावर स्मशानघाटाच्या ठिकाणी साठवन करून चोरी केलेली रेती अंदाजे १२० ब्रास कि. २,४०,०००/रू ची व चोरी करण्याच्या उपयोगात येणारे घटनास्थळा वरून ३ ट्रक ,१ जेसीबी ,१ मोटार सायकल कि. ७५,२०,०००/रू चे वाहन इटगाव शिवार येथे मिळुन आल्याने सरतर्फे सपोनी सय्यद हारूना रिझवी एलसीबी भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहेत.

२) अल्पवयीन मुलगी कुनालाही न सागंता घरून निघुन गेली व परत न आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक १९/११/२०१६ रोजी ०६०० वा. यातील फिर्यादीची अल्पवयीन पुतनी वय १५ वर्ष, ही पाहुनी म्हणुन फिर्यादीचे घरी आली होती ति फिर्यादीचे घरून कोणाला काही न सांगता निघुन गेली तिचा शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व महाराष्ट्र शासनाचे परीपत्रक सिआरटी क्र. ०९१२ पत्र क्र. ५४/पोल –१३ दि. १०/०४/२०१३ चे परीपत्रका प्रमाणे पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सपोनी चौधरी पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

३ जुने वादावरून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुनहा नोंद;–

दिनांक १९/११/२०१६ रोजी १८.०० वा. दर. यातील फिर्यादी बालकदास संपत मेश्राम वय ६६ वर्ष रा. वेळवा हा आपले सायकलने पवनी कडुन आपले गावी परत जात असतांना यातील आरोपीने जुने वादा वरून फिर्यादीला रस्त्यामध्ये थांबवुन माझ्या भाउसुनेला कशाला आपल्या शेतावर बोलावतोस असे म्हणुन शिवीगाळ देवुन जिवे मारण्याची धमकी दिली व बुक्कीने फिर्यादीचे नाकावर मारल्याने रक्त निघुन दुखत असल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४)संगमत करून धानाची कापनी करून व भांडण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १७/११/२०१६ ते दि. १८/११/१६ चे १२.०० वा. दर. यातील ९ ही आरोपीतांनी संगमत करून फिर्यादी धनराज शालीकराम टेंभुर्णे वय ४५ वर्ष रा. आंबेडकर वार्ड लाखांदुर यांच्या मालकीच्या व वहीवाटीत असलेल्याा शेतजमीनीवर फौजदारी पात्र अतीक्रमन केले व फिर्यादीच्या शेतातील धाणाचे पीक चोरून नेण्याचे उद्देशाने धानाची कापनी केली व फिर्यादी सोबत भांडण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखंदुर येथे कलम ३७९,४४७,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहेत.

५) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक १८/११/२०१६ चे २०.४५ ते २१.१५ वा. दर. यातील फिर्यादी उमराव संपत मस्के वय ४५ वर्ष रा. खुटसावरी हा आपली हिरो पॅशन प्रो.मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु निळया रंगाची कि. ३५,०००/रू ची घेवुन रिसेप्शन कार्यक्रमा करीता गेला असता तसेच फिर्यादीचे मोटार सायकल जवळ ठेवुन असलेली संतोष घनश्याम कोराम रा. गुंथारा याची हिरो पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ८६५४ कि. ३५,०००/रू ची असा एकुन ७०,०००/रू च्या २ मोटार सायकल आर.एस.रेस्टारेंट एनएच ०६ रोड गडेगाव येथुन कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसलयाची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९, भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

५) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक १८/११/२०१६ चे २०.४५ ते २१.१५ वा. दर. यातील फिर्यादी उमराव संपत मस्के वय ४५ वर्ष रा. खुटसावरी हा आपली हिरो पॅशन प्रो.मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु निळया रंगाची कि. ३५,०००/रू ची घेवुन रिसेप्शन कार्यक्रमा करीता गेला असता तसेच फिर्यादीचे मोटार सायकल जवळ ठेवुन असलेली संतोष घनश्याम कोराम ७०,०००/रू च्या २ मोटार सायकल आर.एस.रेस्टारेंट एनएच ०६ रोड गडेगाव येथुन कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसलयाची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९, भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक १९/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, कारधा, सिहोरा आधंळगाव साकोली , लाखनी, पवनी, अडयाळ लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७५ लिटर हातभट्टी दारु कि. ५२६०/–रू. व १७ लिटर ३१० मिली लिटर कि. ४,७५०/–रु. असा एकुण कि. १००२०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.